# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ३८२/२०२३ दिनांक – ०२/११/२०२३

## स्वस्त दरात फ्लॅट विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे भासवुन सामान्य जनतेची फसवणुक करणारा फरार आरोपीत पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांना यश.

फिर्यादी नामे - हॅरेल पॅट्रिक साल्वीन वय-६९ वर्ष यांना दिनांक -१३/०३/२०२१ ते दिनांक ०६/०७/२०२१ रोजी पावेतो आरोपी नामे रामसिंग देवडा, शुभम मिश्रा, सुरज दुबे, गौतम चौधरी, व रुम मालक पुलक दास यांनी आपसांत संगणमत करुन रुम नं ए/७०८, क्रिस्टल प्लाझो, यशवंत गौरव, नालासोपारा प. या रुम वर DHFL या बॅकेंचे थकीत कर्ज असताना देखील सदर रूमवर कोणत्याही प्रकारचे कर्ज नाही असे फिर्यादी यांना भासवुन सदरचा रुम रजिस्ट्रेशनद्वारे विक्री करुन फिर्यादी यांचेकडुन रुम करीता एकुण १७,५०,०००/- रुपये चेकद्वारे घेवुन आजपावेतो रुमचा ताबा न देता तसेच फिर्यादी यांनी रुम करीता दिलेले पैसे परत न करता फसवणुक केलेली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ५५८/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ,४२०, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील वसई विरारा परिसरात स्वस्त दरात फ्लॅट विक्रीसाठी उपलब्ध असल्याची जाहिरात देऊन सामान्य नागरीकांची फसवणुक करणारी टोळी सक्रीय झाली होती. सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन पायबंद करणे बाबत सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी सदर गुन्हयातील पाहिजे आरोपीत यांचा शोध घेणे बाबत दिलेल्या सुचना व आदेशान्वये सदर गुन्हयाचा समांतर तपासा दरम्यान तांत्रीक विश्लेषण व गोपनीय बामतीदार यांचे मार्फतीने माहिती मिळवुन गुन्हयातील आरोपीत नामे – सुरज कमलेश कुमार दुबे वय २८ वर्षे, रा. संतोष भवन, कारगिल नगर, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर यास दिनांक ०१/११/२०२३ रोजी ताब्यात घेवुन त्याचेकडे प्राथमिक तपास करता त्याने त्याचे इतर साथीदार यांचे बरोबर आपआपसात संगणमत करुन स्वस्त दरात घर विकत घेऊ इच्छीत सामान्य नागरीकांना हेरुन त्यांची ५०,००,०००/- रुपयांची फसवणुक केले असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. उक्त आरोपीत याचा खालील नमुद गुन्हयात सहभाग निष्पन्न होत आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | नालासोपारा पो.स्टे | ५५८/२०२२ | भा.द.वी.सं. कलम ४२०,३४ |
| २ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | ४३/२०२३ | भा.द.वी.सं. कलम ४२०,३४ |
| ३ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | ५५/२०२३ | भा.द.वी.सं. कलम ४२०,३४ |

आरोपीत सुरज कमलेश कुमार दुबे हा नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ५५८/२०२२ भा.द.वी.सं. कलम ४२०,३४ या गुन्हयामध्ये अटक असुन सद्या पोलीस कोठडी मध्ये आहे.

वरील कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त सो., (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ अभिजीत टेलर, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं. राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, मसुब/ प्रविण वानखेडे सागर सोनावणे, गणेश यादव नेम- गुन्हे शाखा कक्ष -३ तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम- सायबर सेल यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.